# MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED

(A Government of Maharashtra Undertaking)

## Dadasaheb Phalke Chitranagari

Filmcity, Mumbai

https://filmcitymumbai.org

**अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड, डॉ. अनुजा पुरंदरे आणि ओनिल कुलकर्णी यांनी चित्रनगरीच्या महिला अधिकारी-कर्मचारी यांच्या सोबत साधला संवाद**

---

मुंबई, दि. ८ मार्च : फिल्मसिटी अर्थात महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ व बी द चेंज संस्थेच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी चित्रनगरीत महिला दिनानिमित्ताने (Women's Day) विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. यामध्ये सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री निशिगंधा वाड, डॉ. अनुजा पुरंदरे आणि श्री. ओनिल कुलकर्णी यांनी विविध विषयांवर चित्रनगरीतील महिलांसोबत संवाद साधला.

यावेळी व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी सर्व अधिकारी-कर्मचारी महिलांना शुभेच्छा दिल्या. चित्रनगरीच्या विकासामध्ये महिलांचे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रशासकीय स्तरावर चित्रनगरीच्या महिला अधिकाऱ्यांचा सहभाग महत्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मुख्य प्रशासकीय अधिकारी गीता देशपांडे, वित्तीय सल्लागार मुख्य लेखावित्ताधिकारी चित्रलेखा खातू-रावराणे, बी.द.चेंजच्या मुख्य प्रशासकीय अधिकारी आर्या मोरे आणि महामंडळातील महिला अधिकारी-कर्मचारी उपस्थित होत्या.

दरम्यान, मराठी मनोरंजनसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री निशिगंधा वाड यांनी 'स्त्रियांपुढील आव्हाने' या विषयावर संवाद साधला. "आपली पुरुषप्रधान संस्कृती असली तरी आजची स्त्री सशक्त आहे. जगाच्या पाठीवर आज भारतीय स्त्री म्हणून आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण करायला हवी. आपल्यातल्या चांगल्या गोष्टी अधिक चांगल्या कशा होतील आणि उणीवांची वजाबाकी न करता त्यावर सुधारणा केल्या तर यशाचं सहजतेनं स्वागत करता येईल", असं निशिगंधा वाड म्हणाल्या.

डॉ. अनुजा पुरंदरे यांनी 'महिलांचेआरोग्य' या विषयावर भाष्य करताना मासिक पाळी, गर्भधारणा, हृदयरोग, मधुमेह यांसारख्या अनेक समस्यांवर भाष्य केलं. चांगला आहार घेणं, व्यायाम करणं, वैद्यकीय सल्ला घेणं

किती महत्वाचं आहे हे त्यांनी अधोरेखित केलं. त्याचबरोबर  ओनिल कुलकर्णी यांनी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात उपस्थित स्त्रीयांना 'POSH ACT'बद्दल माहिती दिली.